# महाराष्ट्र शासन

क्र. सीएसएल-२०१५/प्र.क्र.१८५//१३-स
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- १३ मे, २०१६

वाचा: १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक.
२: सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सआ/कायदा/क७३कक/निवडणूक/२०१६/२१५२ दि. १२ मे, २०१६.

## आदेश

ज्याअर्थी, राज्यात खरीप २०१५ या हंगामासाठी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या एकूण २७,६०९ गावामध्ये शासनाने दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे सन २०१५-२०१६ च्या रब्बी हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आलेल्या १०५३ गावामध्ये शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे; आणि

ज्याअर्थी, कार्यक्षेत्राची व्याप्ती तसेच सभासद संख्या मोठी असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमूद केलेल्या "अ" वर्गातील सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब प्रमाणे सुरु ठेवल्यास राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अशा संस्थांच्या निवडणुक प्रक्रियेत सभासद शेतक-यांच्या सहभागावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा संस्थांची निवडणुक घेणे लोकहिताच्या दृष्टीने योग्य नसल्यामुळे या संस्थांची निवडणुक काही काळासाठी पुढे ढकलणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री झाली आहे; आणि

ज्याअर्थी, टंचाई, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा इत्यादी कारणास्तव सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या निवडणुका एका वेळी ६ महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत पुढे ढकलण्याचा

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक नुसार शासनास अधिकार प्राप्त आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार राज्यातील सुमारे २८ जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती व तीव्र पाणीटंचाई विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमूद केलेल्या वर्ग "अ" मधील ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या बाबतीत प्रारुप मतदार याद्या अद्याप प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्याचप्रमाणे "अ" वर्गातील ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत न्यायालयाने निश्चित आदेश दिले आहेत, अशा संस्था वगळून "अ" वर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणुक या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यत पुढे ढकलण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

१३/०५/२०१६

(अनिल ज. चौधरी)
कार्यासन अधिकारी

प्रति:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
८. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
९. सर्व सहसचिव/उपसचिव, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अ.मु.स. (पणन),अ.मु.स. (वस्त्रोद्योग)/प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक
११.निवडनस्ती कार्यासन १३-स

# महाराष्ट्र शासन

क्र. सीएसएल-२०१५/प्र.क्र.१८५//१३-स
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
हुतात्मा राजगूरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- १८ मे, २०१६

वाचा: १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक.
२: सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सआ/कायदा/क७३कक/निवडणूक/२०१६/२१५२ दि. १२ मे, २०१६.
३. शासनाचा आदेश क्र. सीएसएल-२०१५/प्र.क्र. १८५/१३-स, दिनांक १३/०५/२०१६.

## शुध्दीपत्रक

उपरोक्त वाचा क्र. ३ येथील शासन आदेशातील परिच्छेद क्र. ४ मधील ४ थ्या ओळीतील "ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या बाबतीत प्रारुप मतदार याद्या अद्याप प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्याचप्रमाणे "अ" वर्गातील ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत न्यायालयाने निश्चित आदेश दिले आहेत, अशा संस्था वगळून, "अ" वर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणुक" या वाक्याऐवजी "ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या बाबतीत प्रारुप मतदार याद्या अद्याप प्रसिध्द झालेल्या नाहीत अशा "अ" वर्गातील सहकारी संस्थांच्या (परंतु "अ" वर्गातील ज्या सहकारी संस्थांच्या बाबतीत मा. न्यायालयाने निवडणुक घेण्यासंदर्भात निश्चित असे आदेश दिलेले आहेत अशा सहकारी संस्था वगळून) संचालक मंडळाची निवडणुक" असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

१८/०५/२०१६

(अनिल ज. चौधरी)
कार्यासन अधिकारी

प्रति:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
८. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
९. सर्व सहसचिव/उपसचिव, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अ.मु.स. (पणन),अ.मु.स. (वस्त्रोद्योग)/प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक
११.निवडनस्ती कार्यासन १३-स